**शब्द**

मिटलेल्या पाकळीवर
खुललेल्या दवावर,
रेंगाळलेल्या नजरेला नाचता आलं पाहिजे,
शब्दांना फुलपाखरासारखं उडता आलं पाहिजे.
स्पंदनांची हुरहूर
देठाला न झेपणारी,
श्वासांच्या लयीत गाता आलं पाहिजे,
शब्दांना फुलपाखरासारखं उडता आलं पाहिजे.
हळव्या हुंकाराचा
पानातल्या सळसळीचा,
मुलायम पदर पकडून धावता आलं पाहिजे,
शब्दांना फुलपाखरासारखं उडता आलं पाहिजे.
तुझा शब्द माझं मौन
माझा शब्द तुझं मौन,
बेचैन मौनाला या उलगडता आलं पाहिजे,
शब्दांना फुलपाखरासारखं उडता आलं पाहिजे.
स्पर्शाच्या अनावर
इंद्रधनुषी रंगात,
मेघांवर स्वार होऊन खेळता आलं पाहिजे,
शब्दांना फुलपाखरासारखं उडता आलं पाहिजे.
ओठातल्या स्मृतीत
गालातल्या गालात,
दडलेल्या लाजेला खळखळून हसता आलं पाहिजे,
शब्दांना फुलपाखरासारखं उडता आलं पाहिजे.
उडालेल्या शब्दांच्या
फुटलेल्या पंखांवर,
प्रेमाची कविता जगता आलं पाहिजे,
शब्दांना फुलपाखरासारखं उडता आलं पाहिजे.

**संध्या रानडे**